( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )

क्र: पोमसं /८अ/नि.सू -२०१६-१७(वश्रेलि ते प्र.लि.)/मफुसल/२३६/२०१६ मुंबई , दिनांक : ०६/०७/२०१७

# -: आदेश :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपीक संवर्गातील खालील नमूद वरिष्ठ श्रेणी लिपीक यांना (अराजपत्रित गट क ) प्रमुख लिपीक (अराजपत्रित गट क ) या पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीवर त्यांची नियुक्ती त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | वरिष्ठ श्रेणी लिपीकांचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नवीन नेमणूकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री किशोर रघुनाथ ओगले | विपोमनि, औरंगाबाद परिक्षेत्र | विपोमनि, औरंगाबाद परिक्षेत्र |
| २ | श्रीमती मिनाक्षी रामचंद्र आहिरे | संचालक, म.पो.अ., नाशिक | समादेशक, रारापोबल, गट क्र ३ जालना |
| ३ | श्री किशोर अण्णाजी हुलके | विपोमनि, नागपूर परिक्षेत्र | विपोमनि, रारापोबल, नागपूर |

**प्रज्ञा सरवदे**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई .

प्रति,

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र / नागपूर परिक्षेत्र
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र ३, जालना

२. उपरोक्त वरिष्ठ श्रेणी लिपीक यांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता सविस्तर अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशांची वाट पाहावी.

३. उपरोक्त वरिष्ठ श्रेणी लिपीकांविरुध्द वरीलप्रमाणे काहीच कार्यवाही प्रलंबित नसेल तर त्यांना **पर्यायी वरिष्ठ श्रेणी लिपीकाची वाट न पाहता** पदोन्नतीवर नवीन नियुक्तीचे ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच त्यांना कार्यमुक्त केल्याचा व पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक सत्वर ह्या कार्यालयास कळवावा.

४. घटक प्रमुखांनी संबंधित वरिष्ठ श्रेणी लिपीकांना विनाविलंब कार्यमुक्त न केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित घटक प्रमुखांची राहील.

५. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीअेच्वाय् /१०८२/सीआर्/११००(२)/अेस्ईआर् -३, दिनांक ०६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची उपरोक्त वरिष्ठ श्रेणी लिपीकांनी नोंद घ्यावी.

६. सदरहू आदेश मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मूळ याचिका क्रमांक क्रमांक २७९७/२०१५ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

७. उपरोक्त वरिष्ठ श्रेणी लिपीक हे पदोन्नतीवर जाण्यास इच्छुक नसतील तर त्यांनी तसा **अर्ज ७ दिवसांचे आत (दिनांक १२/०७/२०१७ पर्यत )** घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावा. तसा अर्ज त्यांनी सादर न केल्यास घटक प्रमुखांनी त्यांना दिनांक १२/०७/२०१७ रोजी न चुकता कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच दिनांक १२/०७/२०१७ मध्यानंतर त्यांच्या वेतन व भत्याची आकारणी करु नये.

८.    पदोन्नती आदेशानंतर जे वरिष्ठ श्रेणी लिपीक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा. तसेच ते पदोन्नतीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्यानंतर पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होत नसतील तर त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करावी.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० / १२
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष.

२.    सदरचे आदेश कृपया पोलीस महासंचालकांच्या संकेतस्थळावर एक महिन्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.